Reg.No. : MAH/1850/2017/PUNE/F-49941/P

# The Mother Global Foundation

- Operated -

## SHREE MANASHANTI CHHATRALAYA

FOUNDER / PRESIDENT - PADMASHRI DR. SINDHUTAI SAPKAL (MAAI)

www.themotherglobalfoundation.org I manshanti0014@gmail.com

Sanstha : Om Rudra Colony, Ramling Road, Near HP Petrol Pump, Shirur (Ghodnadi), Tal. Shirur, Dist. Pune - 412210 (MH)

Mob.: 8600760014 / 9881337914 / 9049474544

**Ref No:886/TMGF/2021** **Date: 11/11/2021**

**प्रति,**

**श्री. बाळासाहेब वाकोजी शिंत्रे साहेब,**

**कोपरखैरणे, नवी मुंबई.**

**<u>शुभाशिर्वाद</u>**

माझ्या कार्यामुळे प्रभावित झालेला आणि दोन तपांहून अधिक काळ माझ्यासोबत कार्यरत असलेला माझा मानसपुत्र डी. बी. महाजन याच्यामुळेच बाळासाहेब शिंत्रे यांचे **'जीवन तरंग'** नजरेखालून घालता आलं. ते मनाला खूप भावलंही! हे आत्मकथन वाचताना त्याकाळातील महाराष्ट्रातील खेड्यापाड्यात राहणाऱ्या बहुसंख्य मुलांचं मी जवळून पाहिलेलं जीवनमान डोळ्यासमोर उभं राहीलं. महाजन याने माझ्या सहवासातल्या आठवणी 'अनाथांची आई' या पुस्तकात लिहून त्याच्या मनाची कवाडं उघडून वाचकांसमोर व्यक्त केली आहेत. मी पोटाच्या भूकेतून 'अनाथांची आई' झाले आणि बाप लहानपणी देवाघरी गेल्यामुळे पोरकं झालेलं बाळू नावाचं हे लेकरू शिक्षणाच्या भुकेतून घडावं हे कौतुकास्पद आहे. प्रथितयश साहित्यिकाचा पिंड नसतानाही वास्तविक जीवनात जे अनुभवले ते शब्दबद्ध करण्यासाठी शारदा इथे सिध्दहस्तपणे प्रकटली आहे. ओघवती भाषा, क्रमबद्ध व शिस्तबद्ध मांडणी आणि भारावून टाकणाऱ्या निवेदनशैलीमुळे हे आत्मकथन खूपच प्रभावी व सुरेख झाले असून लहानथोरांना निश्चितच आवडणारं आहे.

**'बाळुन्या'** हा या पुस्तकाचा चरित्रनायक आहे. अतिदुर्गम वाडी-वस्तीतला एक मुलगा शिक्षणाच्या ओढीने कासावीस होतो; आजुबाजूचा निसर्ग आणि कौटुंबिक परिस्थितीची साथ नसल्याने बालपणीचे इतर सहाध्यायी शाळा सोडून गेले तरी तो स्वतः मात्र शिक्षणाला लक्ष्य मानून जबरदस्त आत्मविश्वास, जिद्द आणि कठोर परिश्रमाने 'कमवा आणि शिका' या योजनेतून पदवीधर होतो. पद आणि प्रतिष्ठेने बाळूचा 'बाळासाहेब' झाला तरी आपली माती आणि माणसांशी असणारी बांधिलकी व इमान कायम ठेवून सेवानिवृत्तीनंतरही सेवाव्रती राहतो.

लेखकाच्या आयुष्यातले अनेक चढ-उतार, सुख-दुःखाचे प्रसंग, शैक्षणिक संघर्ष आणि जीवनाच्या पाऊलवाटेचा वस्तुनिष्ठ आलेख वाचताना रोमांचक अनुभूतींची शब्दचित्रे डोळ्यासमोर उभी राहतात. शून्यातून विश्व निर्माण करण्याची उमेद बाळगणाऱ्या व त्यासाठी धडपडणाऱ्या प्रत्येकाला हे आत्मकथन आपलेसे वाटून प्रेरणादायी ठरेल. पहिल्याच प्रयत्नात सर्वसामान्य माणसाच्या लेखणीतून उतरलेल्या या दर्जेदार साहित्यकृतीस खूप खूप शुभेच्छा व आशीर्वाद!

**आपलीच माई...**

**पद्मश्री. डॉ. सौ. सिंधुताई सपकाळ(माई)**